महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क्रमांक / नाविमं / पमा / 4017.
दिनांक : 20 / 12 / 2023

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक विद्यालये,
नागपूर विभाग.

विषयः– माध्य.शालांत (इ.10वी) प्रमाणपत्र परीक्षा मार्च 2024 च्या शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा–या व लोककला प्रकारात सहभागी होणा–या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत.

संदर्भः– शासन निर्णय क्र.संकिर्ण–2016 / प्र.क्र. / 195 / 16 / एस.डी.–6 दि.24 / 11 / 2017.

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयास अनुसरुन कळविण्यात येते की, शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा–या व लोककला प्रकारात सहभागी होणा–या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबत सुधारित कार्यपध्दतीबाबत शासनाने संदर्भिय दिनांक 24 / 11 / 2017 रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे.

सन 2019 पासून शास्त्रीय कला, चित्रकला (एलीमेंटरी व इंटरमिजिएट दोन्ही परीक्षा उत्तिर्ण होणे आवश्यक) क्षेत्रात प्राविण्य मिळविणा–या व लोककला प्रकारात सहभागी होणा–या विद्यार्थ्यांनाच माध्यमिक शालांत परीक्षेमध्ये अतिरिक्त गुणांची सवलत देण्यात येणार आहे. एखादा विद्यार्थी क्रीडा, शास्त्रीय कला (गायन,वादन,नृत्य) चित्रकला व लोककलेतील सहभाग यापैकी एकापेक्षा जास्त क्षेत्रात प्राविण्य प्राप्त करत असला तरी कोणत्याही ***एकाच क्षेत्रासाठीचे सवलतीचे गुण जे उच्चतम आहेत तेच घेण्यासाठी विद्यार्थी अर्ज करु शकतो.*** त्यानुसार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च 2024 परीक्षेसाठी आवेदनपत्र सादर केलेल्या पात्र विद्यार्थ्यांचे प्रस्ताव सादर करावेत.

उपरोक्त शासन निर्णय विभागीय मंडळाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तरी संदर्भिय शासन निर्णयाचे अवलोकन करुन त्यामध्ये सूचित केल्याप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच निकाल विहित कालावधीत लावणे मंडळास शक्य व्हावे, यासाठी विद्यार्थ्यांनी व शाळांनी खालील वेळापत्रकानुसार प्रस्ताव शाळा / मंडळाकडे सादर करावे.

| करावयाची कार्यवाही | अंतिम दिनांक |
|---|---|
| विद्यार्थ्यांनी शाळेकडे प्रस्ताव सादर करणे | दि.15 डिसेंबर, 2023 |
| शाळांनी विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करणे | दि.15 जानेवारी, 2024 |

कोणताही पात्र विद्यार्थी सदर वाढीव सवलत गुणांपासून वंचित राहणार नाही यांची नोंद घ्यावी.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर.

प्रत माहिती तथा योग्य कार्यवाहीस्तव :–
1) शिक्षण उपसंचालक,नागपूर विभाग, नागपूर.
2) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया.